# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २६/०८/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

## देवलापार पोलीसांनि अवैध गोवंश वाहतुक करणारा पिकअप वाहन पकडून १४ गोवंश यांना जिवनदान

दिनांक २६/०८/२०२० रोजी पोलिस स्टेशन देवलापार येथील पोलीस उपनिरीक्षक पुजंरवाड व स्टाफ गुडमॉनिंग पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, खवासा येथिल टोल नाका येथून जनावर वाहतुक करणारा पिकअप अशोक लेलॅन्ड कंपनीचा वाहन हा खवासा टोल नाका पार झाला आहे. अशा माहिती वरून मानेगाव टेक येथे नाकाबंदी लावली असता एम. एच.–४०/ एटी–९३१६ क्रमांकाच्या अशोक लेलॅन्ड कंपनीचा पिकअप गाडी थांबविन्यास इशारा केला असता ते न थांबता नागपूर च्या दिशेने पळुन गेले. त्यांचा पाठलाग केला असता आरोपी हे चोरबाहुलीच्या जंगलात वाहन सोडुन पसार झाले. आरोपी दिसून न आल्याने पून्हा आरोपीचा शोध घेतला असता आरोपी जंगलामध्ये बसलेला दिसून आला. आरोपी पोलिसांना बगताच पळ काडत होता. पोलिसांने पाठलाग करून एक आरोपीस पकडण्यात यश आले व त्यास नाव चिखरजे असता त्याने आपले नाव जोऐब अब्दुल आरीफ पाशा, वय २२ वर्ष, रा. ड्रॉगन पॅलेस कामठी यास ताब्यात घेवून सदर पिकअप गाडी तपासले असता वाहनात १४(९ गाय, ४ बैल) कि. २,२,०००/–रू. जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. घटनास्थळावरून वाहनसहअसा एकुण किंमती १,२२,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार सतिश नागपुरे पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ११(१)(घ)(डि)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(अ),९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम १८४, १७९ मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पुंजरवाड मो.क्र. ९८२२८८०५५ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री मुख्तार बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन देवलापारचे ठाणेदार सपोनि प्रविण बोरकुटे यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक केशव पुंजरवाड, पोलीस हवालदार सतिश नागपूरे, चालक गजानन कवीराज, पोलीस नायक मोरेश्वर नागोसे, विजय बिसेन, शिवचरण नागपूरे, रमेश खरकटे, पोलीस शिपाई सुर्यप्रकाश वावरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.






पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर